# सेवक वार्ता

ऑक्टोबर-२०२३

वर्ष -४, अंक-१२

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६

### सामाजिक वनीकरण विभागातील रोपवाटिकांचे सेवक संघामार्फत मूल्यांकन अपडेट

सामाजिक वनीकरण विभागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोप वाटिकांचे बळकटीकरण या योजने-अंतर्गत रोपवाटिकांचे सेवक मार्फत मुल्यांकन कामाचा अंतिम अहवाल संचालक, चंद्रमा, चंद्रपूर यांना दि.३.१०.२०२३ रोजी सादर केला आहे.

### 🌻 *नवी आव्हाने*

**वेस्टर्न कोलफिल्डस परिसरा करिता आराखडा तयार करणे... चंद्रपूर वन विभागांतर्गत येणाऱ्या वेस्टर्न कोलफिल्डस लिमिटेडच्या परिसरातील वन्य प्राण्यांचा वावर असल्यामुळे या परिसरातील मानव वन्यजीव संघर्ष टाळणे व वन्य प्राण्यांचा अधिवास संपुष्टात आणणे -करिता उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने व्यवस्थापन आराखडा तयार करण्याबाबत विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर यांनी सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र, शाखा अमरावती, यांना आराखडा तयार करणे बाबत विचारणा केलेली आहे. याबाबत लवकरच अमरावती शाखा निर्णय घेईल. यापूर्वी अमरावती शाखेने ऑर्डनन्स फॅक्टरी, चंद्रपूर येथे याच प्रकारचे काम केले होते.**

*☆~☆~*☆~☆~*☆~☆~

### ✍अभ्यासक्रम सुधारीत करून वाचन साहित्य निर्माण करणेचे काम

अप्रमुवसं संशिप्र म. रा यांनी वन रक्षकांना प्रवेशपूर्व प्रशिक्षणच्या अभ्यासक्रमासाठी अभ्यासक्रमात सुधारणा करण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे. या समितीस दिलेली वेळ ३० दिवस आहे.







समितीची बैठक ३-१०-२०१३ रोजी पुणे येथे झाली.

त्या दि. ३-१०-२०२३ सभेचा वृत्तांत

दि. १६-१०-२०२३ ला सर्व वन प्रशिक्षण संस्थांचे प्रमुख, समितीचे सदस्य, दोन्ही वन प्रबोधनींचे प्रमुख यांची कार्यशाळा कुंडल येथे आहे. तिथे चर्चा करुन ठरविले जाईल. पण गवती कुरण विकास, जैव विविधता संरक्षण, बंदुका हाताळणी प्रशिक्षण देणे, संगणक प्रशिक्षण व सं. व. व्य. यांचे तास कमी करणे यावर एकमत झाले. आकृती बंध तयार होण्याचा आहे. पण दररोज प्रत्येकी एक तास कालावधीची पाच सत्रे असावीत, यावर जवळ-जवळ सहमती झाली.

**प्रकल्प नियंत्रण समिती**

### या महिन्यात सेवक वार्तानें प्रकाशनाची ४ वर्षे पूर्ण केलीत

**कार्यकारी पथकातील सदस्यांचे कामावर नियंत्रण ठेवणे, त्यांना मार्गदर्शन करणे तसेच सनियंत्रण करणेसाठी पुढील प्रमाणे नियंत्रण समिती कार्यरत असेल.**

१.श्री. व्ही. बी. सावरकर: समिति प्रमुख व अध्यक्ष, सेवक संघ.
२.श्री. डॉ. एस. एच. पाटील: सदस्य
३.श्री. शिरीष अस्थाना: सदस्य व *सचिव, सेवक संघ.*
४.श्री. व्ही. टी. पत्की: सदस्य व समन्वयक
५.चंद्रपूर वन प्रबोधिनीतील नियुक्त अधिकारी : सदस्य

५ सप्टेंबररोजी केंद्रीय कार्यकारिणीची आभासी मासिक सभा घेण्यात आली नाही.

दि. १६-१०-२०२३ सभेचा वृत्तांत

सदर सभेसाठी सेवकला आमंत्रण नव्हते. दिनांक 16.10.23 मधील सभेस श्री एम एस रेड्डी सर, श्री प्रवीण सर, श्री त्रिपाठी सर आणि सर्व वन प्रशिक्षण संस्थेचे संचालक उपस्थित होते. त्यामध्ये विषय नुसार आणि आपण सर्वांनी सादर केलेल्या अभ्यासक्रम मधील सुधारणा नुसार चर्चा करून प्रत्येक विषयानुसार वर्ग तासिका ठरविण्यात आले. तरीही पुन्हा यामध्ये कमिटीची पुढील आठवड्यात सभा घेऊन पुन्हा आपण सुचवलेल्या सूचना नुसार अंतिम अभ्यासक्रम वर चर्चा करण्यात येणार आहे म्हणून अजून काही सूचना असल्यास तसे कळविणेबाबत सर्वांना विनंती केली आहे.

*☆~☆~

केंद्रीय कार्यकारिणीची आभासी मासिक सभा झाली नाही.

*☆~☆~




**डिसेंबर - २३ चा सेवक वार्ताचा अंक हा पुन्हा "जुन्या आठवणी विशेषांक"**

सदस्यांच्या खास आग्रहाच्या मागणीवरून डिसेंबर - २३ चा सेवक वार्ताचा अंक हा पुन्हा "जुन्या आठवणी विशेषांक" म्हणून प्रकाशित करणार आहोत. तरी कृपया लेख पाठऊन सहभागी व्हावे. सेवक संघाच्या सदस्यांनी आपल्या जुन्या आठवणी मला DVBW-TT Yogesh किंवा UNICODE- NIRMALA UI फॉन्टमध्ये पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात येत आहे. जुन्या आठवणी मराठीत व यापुर्वी अप्रकाशित असावी. शब्द मर्यादा नाही .

### आरोग्याविषयी टिप्स ...

१. जीने चढू नका, गरजच असेल तर आधाराच्या पाईपला घट्ट धरून चालावे.
२. आपले डोके गतीने फिरवू नका, आधी आपले पूर्ण शरीर वॉर्मअप करा.
३. आपले शरीर वाकवून पायांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करू नका आधी पूर्ण शरीर वॉर्मअप करा.
४. आपला पायजमा उभ्याने न घालता बसून घाला.
५. झोपेतून उठताना तोंड समोर ठेऊन उठू नका तर डाव्या अगर उजव्या कुशीवर वळून उठा.
६. उलटे चालू नका त्याने गंभीर इजा होऊ शकते.
७. खाली वाकून जड वस्तू उचलू नका तर आधी गुडघ्यात वाकून मग उचला.
८. झोपेतून उठताना जलद न उठता प्रथम काही मिनिटे शांत बसून मग उठा.
९. संडासला जोर लावू नका नैसर्गिक होऊ द्या.
कोणते ही "अवयव" हे बाजारा मध्ये मिळत नाहीत आणि चुकून मिळाले तरी खूप महाग आणि आपल्या शरीरात योग्य पद्धतीने सुट होऊन बसतीलच असे नाही म्हणून आपल्या शरीरातील अवयवांची नेहमी काळजी घ्या..
तुम्हीच आहात तुमच्या शरिराचे खरे राखणदार......

*☆~☆~*☆~☆~*☆~☆~

आज का प्रसंग -
<u>कविताओं के विषय..</u>
पर्वतों के क्षरण का शोक मनाती नदियाँ,
तुम्हारे दरवाज़ों पर रुदन कर रहीं हैं....
भेड़ और बकरियाँ भूखी हैं,
चारागाह की छाती सूखी है ....
जलाए जा रहे जंगलों से,
बच आई एक अधजली तितली कहती है..
घरों का ढह जाना, भूख का प्राण लील जाना,
और प्रेम में वियोग.....
कविताओं के शायद यही पसंदीदा विषय हैं...!
_(श्रोत -अज्ञात)_

*_*_*_*_*_*_*_*_*_*_*_*_*_*_

## निधन वार्ता

वन प्रशिक्षण संस्था, शहापूर येथे प्रशिक्षक राहिलेले, वनाधिका-यांच्या संघटन कार्यातील अग्रणी सहभागी असणारे आणि त्यांच्या काळातील कणखर क्षेत्रीय वनाधिकारी म्हणून ख्यातनाम, सन १९७३-७५ बॅचचे वनक्षेत्रपाल श्री.उमेश दिघे यांनी ठाणे येथे दि.११ ऑक्टो. २०२३ चे रात्री ११.४५ वाजता अखेरचा श्वास घेतला. सेवक संघातर्फे त्यांच्या महान आत्म्यास श्रद्धांजली आणि त्यांच्या कुटुंबाला या दुर्दैवी धक्क्याला सामोरे जाण्याची शक्ती देवो, ही प्रार्थना.

- 0 - 0 -


*सेवक संघ, चंद्रपूर शाखेचे सदय श्री. देवीदास कुंदोजवार से. नि. सहा. व्यवस्थापक यांचे दि.०६/१०/२०२३ रोजी अपघाती निधन झाले. सेवक संघ सदस्यांतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांचे आत्म्यास सदगती देवो, ही प्रार्थना. श्री.कुंदोजवार यांनी कन्हारगाव वन्यजीव अभयारण्याचा व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी स्थानिक पातळीवर उत्तम प्रकारे समन्वय साधून उल्लेखनीय मुल्यांकन चमूला मोलाचे सहकार्य केले होते.

~☆~☆~

**यह रचना दिल को छू गई।**

तीन पहर तो बीत गये,
बस एक पहर ही बाकी है।
जीवन हाथों से फिसल गया,
बस खाली मुट्ठी बाकी है।
सब कुछ पाया इस जीवन में,
फिर भी इच्छाएं बाकी हैं
दुनिया से हमने क्या पाया,
यह लेखा - जोखा बहुत हुआ,
इस जग ने हमसे क्या पाया,
बस ये गणनाएं बाकी हैं।
इस भाग-दौड़ की दुनिया में
हमको इक पल का होश नहीं,

*☆~☆~





केवळ खाजगी वितरणासाठी . . . .
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी